# महिला व बाल विकास आयुक्तालय,
# २८,राणीचा बाग,जुन्या सर्किट हाउस जवळ,पुणे-१

---

## प्रसिद्ध पत्रक

१. जिल्हा बाल संरक्षण कक्षातील रिक्त पदांच्या कंत्राटी भरती बाबत ऑनलाईन पद्धतीने ऑगस्ट २०२२ मध्ये मागवण्यात जाहिरात मधील परिपूर्ण अर्ज असलेल्या उमेदवारांची गुणांकनसह गुणवत्ता यादी प्रदर्शित करण्यात येत आहे.

२. अनाथ आरक्षणा अंतर्गत अनाथ उमेदवार यांच्या करिता एकूण रिक्त पदांच्या १ % म्हणजेच २ उमेदवार यांची निवड अनाथ आरक्षणा अंतर्गत करण्यात येणार आहे,ज्या जिल्ह्यातील अनाथ आरक्षणातील उमेदवार यांची निवड होईल त्या सबंधित जिल्ह्यात सदर पदावर अनाथ उमेदवार यांची निवड अंतिम होईल.

३. जिल्हा- धाराशिव (उस्मानाबाद) येथील जिल्हा बाल संरक्षण अधिकारी,बाल संरक्षण अधिकारी – संस्थात्मक ,संरक्षण अधिकारी संस्था बाह्य ,विधी तथा परीविक्षा अधिकारी ही पदे न्यायालयीन प्रकरण असल्याने भरती प्रक्रीयेमधून वगळण्यात आलेली आहेत.

४. जिल्हा – अहिल्या नगर (अहमदनगर) मधील समुपदेशक हे पद सदर पदावरील कार्यरत उमेदवार यांनी दिलेला राजीनामा मागे घेतल्याने सदर पद देखील भारती प्रक्रीयेमधून वगळण्यात आले आहे.

५. बाल कल्याण समिती – डाटा एन्ट्री ऑपरेटर व बाल न्याय मंडळ डाटा एन्ट्री ऑपरेट ह्या पदांची गुणवत्ता यादी तात्पुरत्या स्वरुपात वगळण्यात येत आहे.

**६. गुणवत्ता यादी बाबत उमेदवार यांना काही आक्षेप नोंदवायचे असल्यास सदर आक्षेप dcpubharati2022@gmail.com या ईमेल वर गुणवत्ता यादी जाहीर झाल्या पासून पाच दिवसात नोंदवण्यात यावे तद्नंतर आलेल्या आक्षेप स्वीकारले जाणार नाहीत.**

दिनांक – २२/०८/२०२५

स्थळ – पुणे.

(नयना अर्जुन गुंडे) भा.प्र.से,
आयुक्त,
महिला व बाल विकास विभाग,
महाराष्ट्र राज्य पुणे.